**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दि** १४/१०/२०२६

***सेवा संकल्प अभियानांतर्गत महानगरपालिकेमार्फत दि.१७ ऑक्टोबर रोजी सुरुची समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम***

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत असून, या अभियानांतर्गत विविध उपक्रम महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहेत. या अभियानाच्या अनुषंगाने स्वच्छता ही सेवा २०२६ अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत विविध स्वच्छता मोहिमाही आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्वच्छता मोहिमेअंतर्गत महानगरपालिकेमार्फत शनिवार *दि.१७ ऑक्टोबर २०२६* रोजी *सकाळी ०७.००* वाजता *सुरुची समुद्रकिनारा (Suruchi Beach), वसई (प.)* येथे *किनारपट्टी स्वच्छता मोहीम* (Beach Cleanup Drive) राबविण्यात येणार आहे. यापूर्वीच मागील शनिवारी राजोडी समुद्रकिनारा स्वच्छता मोहिम राबविण्यात आली होती, यात २ हजार पेक्षा जास्त जणांनी उत्साहाने सहभाग घेऊन समुद्रकिनारा स्वच्छ करण्यात आपले योगदान दिले होते.

या स्वच्छता मोहिमेत मा.महापौर, मा.उप-महापौर, मा.आयुक्त यांच्यासह सर्व पदाधिकारी, नगरसेवक, मनपा अधिकारी व कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक समुदाय, अशासकीय संस्था, पर्यावरणप्रेमी, समुद्रकिनारी वापरकर्ते, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी, स्काउट्स विद्यार्थी, खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील प्रादेशिक अधिकारी, महिला बचतगट, पर्यटक, नागरिक या मोहिमेत सहभागी होणार आहेत. समुद्रकिनाऱ्यावर साचणारा प्लास्टिक कचरा, थर्माकोल, काच, कागद व इतर सर्व कचरा गोळा करून किनारपट्टी स्वच्छ आणि सुंदर ठेवणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. यासोबतच समुद्रकिनाऱ्यावर कचरा न टाकणे, प्लास्टिकचा वापर मर्यादित ठेवणे, कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे आणि घनकचरा व्यवस्थापनाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे यावरही भर देण्यात येणार आहे. सामूहिक सहभागातून स्वच्छतेचा संदेश समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येणार आहे.

समुद्रकिनाऱ्याचे पर्यावरण जतन करण्यासाठी आणि परिसर स्वच्छ व कचरामुक्त ठेवण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक समुदाय तसेच विविध शासकीय व निमशासकीय यंत्रणांनी या किनारपट्टी स्वच्छता मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे आणि सुरुची समुद्रकिनारा स्वच्छ, सुंदर व कचरामुक्त ठेवण्यासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.